आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

पान २
पडसाद : सारासार विवेक सुटता कामा नये
पान ८
छोटू पठाणचा जुगार अड्डा उद्ध्वस्त
एटीएम कार्डची अदलाबदल करून गंडा
शेवटचे पान
औद्योगिक विकासाला गती मिळणार
मुंबईचा विजयी चौकार

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक २२७ । गुरुवार, दि. २४ एप्रिल २०२५ । पाने १०+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

# पाकच्या मुसक्या आवळल्या

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताचे पाच कठोर निर्णय

- पाकचे भारतातील दूतावास बंद
- ४८ तासांत पाकिस्तानी नागरिकांनी भारत सोडावा
- सिंधू जल करार स्थगित
- अटारी, वाघा बॉर्डर बंद
- पाकिस्तानी नागरिकांना भारतातील व्हिसा रद्द

नवी दिल्ली । वृत्तसंस्था/प्रतिनिधी

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने कडक पावले उचलत पाकिस्तानची नाकाबंदी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीच्या बैठकीत पाच प्रमुख निर्णय घेण्यात आले आहेत. भारताने या हल्ल्यानंतर पाकिस्तानवर थेट आरोप केला आहे. भारताने पाकिस्तानी दूतावास बंद करण्यास सांगितले असून पाकिस्तानी नागरिकांचे व्हिसा रद्द करण्यात आले आहेत. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली सुरक्षाविषयक मंत्रिमंडळ बैठक अडीच तास चालली. त्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, एनएसए अजित डोभाल यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात २५ भारतीय आणि एका नेपाळी नागरिकाचा मृत्यू झाल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली आहे. या बैठकीत काही महत्त्वाचे निर्णयही घेण्यात आले आहेत. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, सीसीएस निर्णयात सिंधू पाणी कराराला स्थगिती देण्यात आली आहे. पाकिस्तान सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत हा करार स्थगित करण्यात आला आहे. तसेच अटारी बॉर्डर चेकपोस्ट बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ज्यांनी वैध परवानगी घेऊन या मार्गाने सीमा ओलांडली आहे ते १ मे २०२५ पूर्वी त्याच मार्गाने परत येऊ शकतात. सार्कअंतर्गत पाकिस्तानी नागरिकांना देण्यात येणारी व्हिसा सुट रद्द करण्यात आली आहे. पूर्वी जारी केलेले सर्व एसव्हीईएस व्हिसा अवैध मानले जातील. सध्या या व्हिसावर भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडावा लागेल. भारतातील सर्व

पान ८ वर



### दहशतवाद्यांना सोडणार नाही : शहा

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली वाहिली. यानंतर पीडितेच्या कुटुंबियांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी इंस्टाग्रामवर ट्विट केले की, पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात आपल्या प्रियजनांना गमावल्याचे दुःख प्रत्येक भारतीयाला जाणवते. हे दुःख शब्दात व्यक्त करता येत नाही. मी या सर्व कुटुंबांना आणि संपूर्ण देशाला आश्वासन देतो की निष्पाप लोकांना मारणाऱ्या या दहशतवाद्यांना अजिबात सोडले जाणार नाही. यावेळीही अमित शहा यांनी हेलिकॉप्टरमधून परिस्थितीचा आढावा घेतला.

### दृष्टिक्षेपात

- आज दिल्लीत सर्वपक्षीय बैठक
- मृतांच्या कुटुंबियांना केंद्र सरकारकडून प्रत्येकी १० लाखांची मदत
- जगभरातून पंतप्रधान मोदींना निषेधाचे फोन
- देशात ठिकठिकाणी निषेध मोर्चे
- मृतांमध्ये सैन्य दल आयबीमधील अधिकाऱ्यांचा समावेश
- मृतांमध्ये एका स्थानिक व्यावसायिकाचाही समावेश
- सीमावर्ती राज्य पंजाबने सुरक्षा वाढवली
- दिल्लीत उच्च सुरक्षा
- दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्याला २० लाख रुपयांचे बक्षीस
- सुरक्षा दलाकडून खोऱ्यातून १५०० हून अधिक लोक ताब्यात
- हल्ल्यानंतर दहशतवादी पाकिस्तानात पळाल्याचा अंदाज
- विमानाच्या तिकिटातही घसरण

### बुरखा पुन्हा फाडला

पहलगाममध्ये नरसंहार करणाऱ्या चार मानवरूपी दानवांचे फोटो समोर आले आहेत. आदिल गुरू, आसिफ शेख, सुलेमान शाह आणि अबू तल्हा अशी त्यांची नावे आहेत. यातील दोन जण स्थानिक आहेत, तर दोन जण पाकिस्तानी आहेत. आदिल गुरी हा अनंतनाग जिल्ह्यातला आहे, तर आसिफ शेख हा सोपोरचा आहे. यानिमित्ताने दहशतवादी पाकिस्तानचा भारताने पुन्हा बुरखा फाडला आहे.

### हल्ल्याचा कट पाकमध्येच

या हल्ल्यामागचा मास्टरमाईंड हा सैफुल्लाह खालिद ऊर्फ सैफुल्लाह कसुरी हा असल्याचे समोर आले आहे. तो टीआरएफ या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असून हाफिज सईदचा तो निकतवर्तीय असल्याची माहिती आहे. या हल्ल्याचा कट पाकिस्तानमध्ये रचल्याचे समजते.




मुंबईतील गुरुकुल स्कूल ऑफ आर्टच्या विद्यार्थिनींनी चित्रे रेखाटून जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला.

## अखवा महाराष्ट्र सुन्न; मृतांवर अंत्यसंस्कार

मुंबई । वृत्तसंस्था

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा मृत्यू झाल्याने अवघा महाराष्ट्र सुन्न झाला आहे. काल सायंकाळी विशेष विमानाने डोंबिवलीतील तिघांचे तर पनवेलमधील एका पर्यटकाचा पार्थिव आणण्यात आला. चौघांवर शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

डोंबिवलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर पनवेलमध्ये मंत्री दादा भुसे अंत्यसंस्कारासाठी उपस्थित होते. यावेळी नातेवाईक व कुटुंबियांना अश्रू अनावर झाले होते. पनवेलमधील दिलीप देसले, डोंबिलीतील संजय लेले, अतुल मोने आणि हेमंत जोशी या पर्यटकांचाही या हल्ल्यात मृत्यू झाला, तर पुण्यातील संतोष जगदाळे व कौस्तुभ गणबोटे यांचा काल रात्री उशिरा उपचारावेळी मृत्यू झाला. दरम्यान, हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या सहा पर्यटकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाखांची मदत मुख्यमंत्री फडणवीस यांनी जाहीर केली आहे. तसेच जखमींना दोन लाखांची मदत देण्यात येणार आहे.



## जिल्ह्यातील ६१ पर्यटक सुरक्षित

### प्रशासनाचा संपर्क

नाशिक । प्रतिनिधी

काश्मीर पर्यटनासाठी नाशिक जिल्ह्यातूनही ६१ पर्यटक गेल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याकडून हेल्पलाईन नंबर जारी करत जिल्हा प्रशासनाशी नातेवाईकांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हा प्रशासनाकडून ८० ट्रॅव्हल एजन्सीशी नियंत्रण कक्षाकडून संपर्क साधण्यात आला. त्यात ५० पर्यटक ट्रॅव्हल्स कंपन्यांसोबत ६१ लोक गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तर ११ पर्यटक स्वतंत्ररीत्या गेल्याचे समजते. त्यांनीही जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधला आहे.

जिल्ह्यातील एकूण ६१ पर्यटक सध्या जम्मू-काश्मीर येथे असल्याची माहिती आहे. सर्व पर्यटक सुरक्षित आहेत. यात लहाने यांनी राज्य आपत्ती नियंत्रण कक्षाशी संपर्क साधत त्यांची मुलगी व इतर आठ व्यक्ती श्रीनगर येथे असल्याची माहिती दिली. श्रीनगर येथे एकूण तीन कुटुंब गेले असून एकूण ८ व्यक्तींचा समावेश आहे. त्यात तीन महिला, तीन पुरुष व दोन लहान मुले असल्याचे समजते. सर्वजण श्रीनगर येथे असून त्यांचे विमानाचे तिकीट शनिवार (दि.२६)चे आहे. परंतु त्यांना परतण्यासाठी लवकर तिकीट मिळावे अशी त्यांनी

पान ८ वर

### पर्यटकांकडून काश्मीर सहल रद्द

पहलगामच्या दहशतवादी हल्ल्यानंतर काश्मीरला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते, अशी भीती व्यक्त होत असून त्याची झलक नाशिकमध्ये आजपासूनच दिसू लागली आहे. नाशिकमधून दरवर्षी साधारण एक लाखाच्या जवळपास पर्यटक काश्मीर, श्रीनगर, अमरनाथला जात असतात. मे व जून या दोन महिन्यात सर्वाधिक जाणाऱ्यांची संख्या असते. यंदाही अमरनाथला जाण्यासाठी इच्छुकांनी रांगा लावल्या होत्या. मात्र आजपासून त्यांनी प्लॅन बदलण्यास सुरुवात केली आहे. त्याऐवजी शिमला, कुलू, मनाली, दार्जिलिंग, कोकण, गोवाकडे ते वळत आहेत. मोठ्या संख्येने पर्यटकांनी त्यांचे काश्मीरचे बुकिंग रद्द करण्यास सुरुवात केली आहे. तानचे माजी अध्यक्ष दत्ता भालेराव यांनी सांगितले की, पहलगाम हल्ल्यानंतर पुढील ४-५ महिन्यांसाठी बुकिंग रद्द करण्याचे फोन येत आहेत. या हल्ल्यामुळे स्थानिक आणि पर्यटनाचे मोठे नुकसान होईल. यात स्थानिक हॉटेल, विमान, रेल्वे बुकिंग रद्द करण्यात येत असल्याने त्याची झळ संबंधितांना बसणार आहे.

## संपादकीय

### गुरुजींचा पालकांना सुट्टीचा गृहपाठ

सातारा जिल्ह्यातील करंजखोप शाळेतील एका गुरुजींनी पालकांना लिहिलेले पत्र सध्या समाज माध्यमांवर फिरत आहे. मुलांना सुट्टी लागली की त्यांचे बहुसंख्य पालक पुन्हा एकदा कुठे ना कुठे गुंतवण्याचा प्रयत्न करतात. पण उपरोक्त शाळेतील गुरुजींनी चक्क पालकांनाच सुट्टीतील गृहपाठ दिला आहे. तो मुले आणि पालक यांचे सान्निध्य घडवणारा, त्यांच्यात संवादाचा पूल बांधणारा आणि त्यानिमित्ताने मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न करणारा ठरू शकेल. तो गृहपाठ मुळातच वाचण्यासारखा आणि ठरवले तर अमलातही आणण्यासारखा आहे. निदान उन्हाळ्याची सुट्टी तरी मुले आणि पालकांनी एकमेकांच्या सहवासात घालवावी, अशी अपेक्षा गुरूजी त्यात व्यक्त करतात. त्यांनी गृहपाठात सुचवलेले उपक्रमदेखील त्यालाच पूरक ठरू शकतील. उदाहरणार्थ, एकवेळचे जेवण सोबत करा, मुलांना पालकांच्या कामाच्या ठिकाणी घेऊन जा आणि त्यांचे पालक कुठे आणि किती काम करतात ते बघू द्या, मुलांना स्थानिक यात्रा किंवा बाजारात घेऊन जा.. अशा किमान पंधरा गोष्टी त्यांनी सुचवल्या आहेत. मुले आणि पालक बरोबर धमाल करू शकतील, सहवासातूनच संवाद घडेल अशाच त्या आहेत. यातून कदाचित मुले त्यांचे मन त्यांच्याही नकळत पालकांजवळ व्यक्त करू शकतील. गुरुजींना हा गृहपाठ पालकांना द्यावासा वाटला याचाच दुसरा अर्थ, पालक-मुले यांच्यातील सहवास आणि संवादाची उणीव त्यांनाही जाणवली असावी. साधारणतः एक दशकापूर्वीपर्यंत मुले आणि त्यांचे पालक गुरुजींना अपेक्षित पद्धतीने सुट्टी घालवायचे. दुपारी बैठे खेळ, घरकामात मदत आणि संध्याकाळी गल्ल्या किंवा मैदाने दणाणून सोडणे म्हणजे मुलांची सुट्टी. तथापि सध्या सुट्टी म्हणजे डोक्याला ताप अशीच बहुसंख्य पालकांची भावना आढळते. यावर वेळेच्या अभावाचे कारण सहज पुढे केले जाऊ शकेल. तथापि मुलांच्या वाट्याचा वेळ नेमका कोण खाते हे वेगळे सांगायला हवे का? संवादासाठी वेळ कसा काढला जाऊ शकेल हा चर्चेचा वेगळा विषय होऊ शकेल. तथापि, संवादाची गरज बहुसंख्य पालकांना जाणवते की नाही हा खरा कळीचा मुद्दा आहे. त्याशिवाय त्याचा इतका अभाव गुरुजींना जाणवला नसता. सध्या हा संवाद खूप साचेबद्ध झाला असावा का? म्हणजे अभ्यास करतो ना.. अजून काही पाहिजे आहे का... बाकी विशेष काही नाही ना.. ही प्रश्नोत्तरे म्हणजे संवाद असे झाले असावे का? पण ते फक्त माहितीचे आदानप्रदान ठरू शकेल. गुरुजींनी दिलेल्या गृहपाठाच्या निमित्ताने पालक याचा विचार करतील का? तात्पर्य, सुट्टीत मुलांशी खूप गप्पा मारा, सहवासाचा आनंद घ्या हे गुरुजींचे मागणे पालकांनी मनावर घ्यावे असेच आहे.

# वणवे वाढले; वनसंपदेची हानी

## त्र्यंबकेश्वर तालुक्यात एकाच दिवशी दोन घटना

त्र्यंबकेश्वर । मोहन देवरे

एकीकडे आपण जागतिक वसुंधरादिन साजरा करतो आणि दुसरीकडे जंगलाला आग लावण्याचे प्रकार सुरू आहेत. असेच दोन प्रकार त्र्यंबकेश्वरच्या पर्वतरांगांमध्ये घडले आहेत. दोन्ही ठिकाणी मोठी आग लागून वनसंपदेबरोबर सरपटणारे प्राणी, कीटक यांना हानी पोहोचली.

येथून तीन किलोमीटर अंतरावरील डोंगरावर सायंकाळी आग लागली. यात गवत, झाडेझुडपे यांचे मोठे नुकसान झाले. वाळलेले गवत मोठ्या प्रमाणावर जळाले. येथील गौतम तलावाच्या पाठीमागे असलेल्या पंचलिंग डोंगर पट्ट्यातील डोंगराच्या कपारीला टोकावर उंचावर मोठी आग लागली. सायंकाळी वारा सुटल्याने उंचीवरून गवत

पान ८ वर



### वणव्याचे नैसर्गिक कारण

उष्णतेच्या लाटांमुळे जंगलातील गवत, पाने, आणि लाकडे कोरडे होतात, ज्यामुळे आग लागण्याची शक्यता वाढते. आपल्या राज्यात उष्ण हवामान आणि कमी पर्जन्यमानामुळे वणव्यांचा धोका अधिक असतो.

### मानवी कारणे

जंगलात किंवा शेतात फेकलेली सिगारेट किंवा विडी, शिकार किंवा पर्यटनादरम्यान केलेली निष्काळजी कृती यामुळे आग लागू शकते. विशेषतः उन्हाळ्यात या कारणांमुळे वणव्यांची शक्यता अधिक असते. अनेक शेतकरी शेतातील अवशेष जाळतात. त्यातून कधी कधी आग नियंत्रणाबाहेर जाऊन जंगलात पसरते आणि मोठा वणवा तयार होतो. अवैध शिकार आणि लाकूडतोड करणारे लोक. शहरीकरण आणि जंगलात बांधकाम.

# थकबाकीदारांना व्याजदरात सवलत

## जिल्हा बँक वसुलीचा मार्ग अधिक सुलभ

नाशिक । प्रतिनिधी

नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या थकीत कर्जदारांना व्याजदरात भरघोस सवलत देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. व्याजात सवलत मिळाल्याने कर्जदारांना मुद्दल भरावी लागेल. त्यामुळे कर्जवसुलीचा मार्ग आता अधिक सुलभ झाल्याने जिल्हा बँकेची वसुली मोहीम पुन्हा सुरू होईल.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा बँकेसंदर्भात बुधवारी (दि.२३) मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे या चार मंत्र्यांसह जिल्ह्यातील आमदार उपस्थित होते. बैठकीत जिल्हा बँकेच्या अधिकाऱ्यांनीही विविध सूचना केल्या. एक लाखापर्यंत थकीत कर्जदारांना दोन टक्के, एक ते पाच लाखापर्यंतच्या कर्जावर तीन टक्के, पाच ते सहा लाखांपर्यंतच्या कर्जावर चार टक्के आणि त्यापुढील कर्जावर पाच टक्के असे सरळ व्याज आकारण्याची सूचना करण्यात आली. चक्रवाढ व्याज टाळून थकबाकी वसुलीला प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र, कर्जदारांना २५ टक्के थकबाकी त्वरित भरण्याची सक्ती करण्यात आली आहे. व्याजात सवलती दिल्यानंतर सहा महिन्यांचे हप्ते करून द्यावे, अशीही सूचना करण्यात आली. जिल्हा बँकेचे १२७ कर्जदार मयत झाले आहेत. त्यांच्या वारसदारांकडून केवळ मुद्दल वसूल करण्याची सूचना करण्यात आली. बँकेला तातडीने ९०० कोटींची गरज आहे.

पान ८ वर



### अशी होईल व्याज आकारणी

- एक लाखापर्यंत- २ टक्के
- एक ते पाच लाखांपर्यंत -३ टक्के
- पाच ते सहा लाखांपर्यंत - ४ टक्के
- सहा ते दहा लाखांपर्यंत - ५ टक्के